# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २२ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ०६/१२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ०६/१२/२०१९ **शुक्रवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.खडके सुनिल वामनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री. कोल्हे प्रविण रामदास | श्री.लढढा नितीन बालमुकुंद |
| श्री.सनकत चेतन गणेश | श्री.भंगाळे विष्णु रामदास |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. पाटील राजेंद्र झिपरु | शेख सैईदा युसुफ |
| सौ.देशमुख प्रतिभा गजानन | |

सदर सभेस, मा.उपायुक्त. श्री. मिनानाथ दंडवते, मा.उपायुक्त . उत्कर्ष गुटे, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्य श्री.ढेकळे सदाशिव गणपत तसेच श्री.पोकळे दिलिप बबनराव यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते अध्यक्ष महोदय यांनी मंजूर केलेले आहेत.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय , प्रथम मी आपले अभिनंदन करतो , कारण की मागील काही मिटींग मध्ये उपस्थित राहु शकलो नाही , तसेच दुसरे असे की सभा निश्चित अशा एका दिवशी ठेवण्यात यावी जेणेकरून एक विशिष्ट दिवस ठरलेला असल्यामुळे एक सुविधा होत आहे. आणि आपण जे अभिनंदनीय कार्य केले की ज्या दिवशी मिटींग होते त्याच्या २४ तासांच्या आंतमध्ये झालेल्या सभेचे ठराव प्रशासना ला हस्तांतरीत करीत असता जेणेकरुन कामाला विलंब होत नाही आणि त्यामुळे कामाला शुभारंभ होत असतो या दोघी गोष्टींचे मी आपले अभिनंदन करतो . धन्यवाद !

**मा.सभापती :-** धन्यवाद !

**नगरसचिव :- विषय क्र. १.** दिनांक २२/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि. २२/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कोल्हे प्रविण रामदास**

**अनुमोदक :-दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** प्रभाग समिती क्रं.३ कडील यु.क्र.०३/०४ मधील विविध विषयांतर्गत पाणीपट्टीच्या रक्कमा एकुण रु.३०,३२०/- मात्र निर्लेखित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** आलेल्या प्रस्तावामध्ये सन २०११ ते १२ आणि सन ११/१२ ते २०१९/२० या वित्तीय वर्षाची पाणी पट्टी आपल्याला थकबाकी दिसते आहे. आणि ते चुकुन झाले आहे असा प्रस्ताव आपल्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडुन आलेला आहे.आणि ते माफ करण्यात यावं आपण घरपट्टी सोबतच पाणीपट्टी , नळपट्टी ची सुध्दा आकारणी करतो . ईतक्या वर्षामध्ये संबधित अर्जदाराने आपल्याकडे अर्ज केलेले दिसत नाहीत. तर आता ०४/०५/२०१९ रोजी त्याने अर्ज केलेला आहे . मग इतक्या वर्षापर्यंत आपल्या अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे वसुली बाबत काही कारवाई केली नाही का. आणि दोन वेळा जी आकारणी केलेली आहे का दोन वेगळे वेगळे बिल दिले आहेत. याचा खुलासा द्यावा.

**श्री. चंद्रकांत पंधारे ,प्र.स.क्रं.३ अधिक्षक :-** हे निर्लेखित बाबतचे जे प्रकरण होते हे प्रभाग समिती क्रं. ३मधुन आलेले आहे. प्र.स.क्रं. ३ मधील कार्यासन ०३/०४ मधील संबंधित नागरीकाने वेळोवेळी अर्ज दिलेले होते. तरी आम्ही स्पॉट

व्हेरीफीकेशन केलेले आहे तसेच संबंधित त्यावॉर्डातील इंजिनियर यांनी तसा अहवाल दिलेला आहे . म्हणुन आपण निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव दिलेला आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** आपण ह्या डॉकेट मध्ये ०४/०५/२०१९ चा अर्ज म्हटलेलं आहे.

**श्री. चंद्रकांत पंधारे ,प्र.स.क्रं.३ अधिक्षक :-** नाही त्याने ०४/०५/२०१९ चा अर्ज आता दिलेला आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** मग वेळोवेळी दिले असा उल्लेख का नाही आलेला आहे. ती चौकशी करा , कोण आहे अजुन दुसरे , सदर चैकशी करून त्यानंतर मग सादर करावा.

**श्री. चंद्रकांत पंधारे ,प्र.स.क्रं.३ अधिक्षक :-** ठिक आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** म्हणजे आधी चौकशी करायची आणि नंतर मान्य करायचं.

**श्री. नितीन बरडे :-** डॉकेटचं अपुर्ण आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** दुसरा जो आहे याच्यांत जो अर्ज दिलेला आहे. त्याचे वर्णन काही दिलेले नाही फक्त अमाऊंट दिलेली आहे.

**मा.सभापती :-** याच्यामध्ये प्रस्तावाची पार्श्वभुमि जी आहे ते अत्यंत मोघम स्वरूपाचं आहे. प्रशासनाने अश्या स्वरूपाचा अहवाल द्यायला नको . म्हणजे डॉकेटमध्ये संपुर्ण अहवाल यायला पाहीजे म्हणजे सदस्यांचा प्रश्न लक्षात घ्या त्यांचा प्रश्न हा आहे की याच्यात २०११/१२ ते २०१९/२० ऐवढया वर्षांची ही रक्कम आहे तिथे जर कनेक्शनच नाही तर मग आपण त्यांना पाणी पट्टी का लावत होतो. हि चुक प्रशासनाची आहे. ही चुक वेळीच आपल्या लक्षात का आली नाही .त्याच्यावर वेळीच ॲक्शन का घेतली नाही. ईतकी जास्त मागणी का झालेली आहे. या सगळयांचा अहवाल पुढच्या स्थायी समोर ठेवायचा आहे आणि आपण यापुढे मोघम स्वरूपाचा अहवाल ठेवायचा नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९३ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे की**, प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावात सन २०११-१२ ते सन २०१९-२० इतकी वर्षे पाणीपट्टीची आकारणी कशी करण्यात आली ? यासंदर्भात प्रस्तावात बोध होत नसल्यामुळे तसेच सदरचा प्रस्ताव अपूर्ण व मोघम स्वरुपाचा असल्याने सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

प्रशासनाने विस्तृत व परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन पूढील स्थायी समिती सभेपूढे सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :-कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.३०/०९/२०१९ ते दि.०६/१०/२०१९, दि.०७/१०/२०१९ ते दि.१३/१०/२०१९, दि.१४/१०/२०१९ ते दि.२०/१०/२०१९ व दि.२१/१०/२०१९ ते दि.२७/१०/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री. प्रविण कोल्हे :-** विषयाची माहिती घेतली..

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**श्री. नितीन बरडे :-** साहेब आपल्या अग्निशमनचे टेंडर झाले का.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** हो झाले.

**श्री. विष्णू भंगाळे :-** काय झालं , कोणत्या स्टेप ला आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** अग्निशनमच्या गाडयाबाबत काल टेंडर ओपन केलेले आहेत आज त्याचे डॉक्युमेंट व्हेरीफीकेशन होतील. तो पावेतो ते १२ तारखेला येईल आणि ती फाईल आम्ही ऑडीट विभागाकडे पाठविलेली आहे. आणि काल आयुक्त साहेबांची सही झाली की आणि काल सभापतींना विनंती केलेली आहे की पुढच्या शुक्रवारच्या आधी जर मिटींग जर घेण्यात येईल. तर शक्य असेल याबाबतीत तर आपण थोडासा लवकर निर्णय घेवुन आपण

**श्री. नितीन बरडे :-** ३१ मार्च डेडलाईन आहे मॅडम त्याला.

**मा.सभापती :-** हो .

**श्री. नितीन लढ्ढा :-** प्रचंड विलंब झालेला आहे या गोष्टीला

**मा.सभापती :-** लवकरात लवकर आपण निर्णय घेवु.

**श्री. विष्णू भंगाळे :-** नाही मॅडम तीन स्टँडींग पासुन आपण सांगतोय की पुढील मिंटींगला किंवा पुढच्या काळामध्ये ते होईल. आणि आपण जर ती डेडलाईन जर लक्षात नाही घेतली तर त्या गाडया कालबाह्य कराव्या लागल्या तर मग.नुकसान कोणाचे होणार आहे.

**मा.सभापती :-** आपण हा विषय आता इतपर्यंत आणलेला आहे. आणि त्यांनी ही L१ ओपन केलेला आहे. बहुतेक आज होईल.

**श्री. विष्णू भंगाळे :-** त्याच्यावर लक्ष देऊन करा. कारण आपला नगरपालिकेच फायदा होणार आहे. आणि गाडया कालबाह्य होण्यातुन वाचणार आहे.

**मा.सभापती :-** नक्की नक्की. मी फॅलोअप घेत आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** त्यातील दोन व्हीईकलचा जो विषय आहे. ते आम्ही जनरल बॉडीसाठी दिलेला आहे. लवकरात लवकर झाले तर त्या दोन व्हीईकलचा सुध्दा विषय मार्गी लागेल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.३०/०९/२०१९ ते दि.०६/१०/२०१९, दि.०७/१०/२०१९ ते दि.१३/१०/२०१९, दि.१४/१०/२०१९ ते दि.२०/१०/२०१९ व दि.२१/१०/२०१९ ते दि.२७/१०/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कोल्हे प्रविण रामदास**

**अनुमोदक :-दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१८/११/२०१९ ते दि.२२/११/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, जमा खर्चाचा साप्ताहीक अहवाल आता पर्यंत येत नव्हता. आता व्यवस्थीत आहे. पण जे राहिलेला आहे ते पुढच्या मिटींग मध्ये घेण्यात यावा.

**मा.सभापती :-** मागच्या अहवालांची प्रत देण्यात यावी. आणि प्रत्येक मिटींगला अहवाल देण्याची दक्षता घ्यावी.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** नगरसेवक निधीची तरतुद करणेत यावी. कारण छोटेमोठे काम असतात वार्डामध्ये.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्यांच म्हणण अस आहे अध्यक्ष महोदया, महानगरपालिका महाराष्ट्र मध्ये जिथे जिथे नगरसेवकांचे निधी आहे त्याच प्रमाणे आम्हाला नगरसेवक निधी उपलब्ध करुन द्यावा. किरकोळ काम पण असलं, पाईप टाकायच असल तर टिप्पणी करा, कोटेशन करा. नगरसेवकांच जे काही ५-१० लाख निधी असतं. ते आम्हाला सर्व नगरसेवकांना सभेमध्ये पुर्तता करावी.

**मा.सभापती :-** प्रशासनाने या सर्व गोष्टींची नोंद घ्यायची आहे. आणि येत्या बजेट मध्ये नगरसेवक निधीची तरतुद करायची आहे. त्यांचा फायदा आपल्याला होईल. किरकोळ कामांसाठी जो नगरसेवकांना रोष घ्यावा लागतो . किरकोळ कामात सुध्दा खुप फॅलोअप घेऊन अडचणी येतात. तर ते तस होऊ नये. त्यासाठी नगरसेवक निधीची आपण बजेट मध्ये तरतुद करायची. या संदर्भात इतर महापालिकांचा आपण अभ्यास करून माहिती घ्या. आणि मला वाटतं आपल्याकडे पुर्वी नगरसेवक निधीची तरतूद होती.मात्र आपली आर्थिक परिस्थीती नव्हती त्यामुळे आपण ते बंद केलेलं होतं. आता आपली आर्थिक परिस्थिती सुध्दा सुधारली आहे. तर आता निधीची तरतुद करायला आणि त्याचं Implementation करायला सुध्दा आपल्याला जमणार आहे. तर ते आपण कराव.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१८/११/२०१९ ते दि.२२/११/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी अहवालाची माहिती घेतली.

प्रशासनाने यामागील प्रलंबित लेखा तपासणी अहवाल पूढील स्थायी समिती सभेपूढे माहितीस्तव ठेवावेत.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :-कोल्हे प्रविण रामदास**

**श्री.नितीन लढढा :-** कालचं शासनाकडुन आदेश आले की, १०० कोटीच्या कामांना स्थगिती मिळालेली आहे. खरं बघितल तर या युक्तीची आठवण येते दैव देतं आणि कर्म नेतं . आज साधरणत: ऑगस्ट २०१८ रोजी या १०० कोटी रूपयांच्य निधीची राज्य सरकार कडुन मान्यता मिळालेली होती. आणि तब्बल १६ महिने या १०० कोटींच्या निधीना मान्यता मिळुन झाली होती .साधारणत: महासभा ठराव क्रं. ७२ दि.१९/०१/२०१९ रोजी १५९ कामांना मान्यता देण्यात आलेली होती. म्हणजे राज्य शासनाकडुन १०० कोटींच्या आर्थिक नियोजनाच्या नंतर म्हणजे तब्बल ५ महिन्यांनंतर खऱ्या अर्थाने या महासभेसमोर या विकास कामांचे अदांज पत्रक मान्यतेसाठी या सभागृहात आले होते. म्हणजे मुळात तो ५ महिन्यांचा कालावधी हा खुप मोठा झाला . तदनंतर जळगांव शहर महानगरपालिकेचा कर्तव्यदक्ष अधिकारी वर्ग असतांना सुध्दा या संपुर्ण कामांचा घोळ पी.डब्ल्यु.डी.च्या माध्यमातुन व्हावा. अशी काहीतरी आग्रही मागणी कुणीतरी लावुन धरली होती.आणि त्या अनुषंगाने कालच्या दिवशी पहिल्यांदा टेंडर त्या कामाचे प्रसिध्द झाले .म्हणजे तब्बल आज जवळ पास निधीची घोषणा होवुन १६ महिन्यांच्या कालावधीनंतर त्या कामांची निविदा प्रक्रीया तीही साधारणत: ४२ कोटी रुपयांच्या जवळपासचीच आहे. अश्या पध्दतीने जर कधी विहीत वेळेमध्ये निधी योग्य पध्दतीने खर्च केला जावु शकत नसेल. आणि ज्या पध्दतीने राज्य शासनाने या संपुर्ण कामांना स्थगीती दिलेली आहे. आता भविष्यात माहिती नाही की सरकार मध्ये त्याच्या प्राथमिकता बदलल्या असतील. जर त्याच्या कर्ज फेडीच्या दृष्टीकोनातुन आर्थिक नियोजन होत असेल .आणि अश्या पध्दतीने हा निधी विहीत कालावधी मध्ये न वापरला गेल्यामुळे या महानगरपालिकेच्या अंतर्गत येणारे या संपुर्ण नागरीकांना या संपुर्ण शहरामध्ये आपण बघतो आहे.आणि नागरीक त्यांना सामोरे जातायं याला कोण जबाबदार राहील.

**मा.सभापती :-** नितीन भाऊंनी आत्ता जी गोष्ट मांडलेली आहे . तर खरतर ही अत्यंत दुर्देवी गोष्ट आहे की . हा निधी स्थगित झालेला आहे आणि याचं सर्वच नगरसेवकांना दुख: आहे . पण ईथे मी प्रार्थना करू ईच्छिते की ,हा निधी आपला स्थगीत झालेला आहे. आपले सर्व कार्यादेश , हि सर्व प्रोसीजर मुळामध्ये थांबलेली आहे तर शेवटी तुम्ही म्हणा की आम्ही म्हणा वेगवेगळया गटातुन जरी असलो आपल्या सगळयांचा मुळ उद्देश जळगांवचं भल करणं हाच आहे. आपला अजेंडा कॉमन आहे. तर आता तुमची सत्ता तिथे आहे तर आम्ही तुम्हाला विनंती करतो की हा निधी आणण्यासाठी , हि स्थगीती उठविण्यासाठी तुम्ही प्रयत्न करा आम्ही तुमच्या सोबत नक्कीच आहोत.आणि जे कामं आपल्याला मार्गी लावयाची आहेत.आता आपण श्रेयवादाच्या लढाईत न पडता हा निधी कसा आपण परत आणु शकु या विषयी आपण प्रयत्न करुया . तुमच्या प्रयत्नांना आमची साथ नक्कीच मिळेल. आणि त्याचा विनियोग सुध्दा ताबडतोब होईल.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महादेय आपलं म्हणणं मला १०० टक्के मान्य आहे. आपण याच्यात राजकारणी म्हणुन पाहु नये .

**मा.सभापती :-** बरोबर आहे. शेवटी हा शहराचा प्रश्न आहे.

**श्री.नितीन लढढा :-** शेवटी हा शहराच्या विकासाचा प्रश्न आहे .सत्ता आपली असली काय आणि आमची असली काय आणि नागरीकांना मुलभुत सुविधा देणं हे तुम्ही आम्ही सर्वचं सदस्यांच कर्तव्य आहे. परंतु अश्या पध्दतीने चुकीचे अट्टाहास धरून, जर कधी हीच महानगरपालिकेच्या माध्यमातुन ही संपुर्ण निविदा प्रक्रीया राबविली गेली असती तर कदाचित आज ही वेळ आली नसती . माझ सांगांयच तात्पर्य ते नाहीये. याचे प्रयत्न तुम्ही करणार आम्ही करणार शेवटी आपण सगळेचं जणं या शहरासाठी झटु या त्याबद्दल काही वाद नाही. परंतु काय असतं की , राज्य शासनाच्या प्राथमिकता बदललेल्या आहेत. समजा हा निधी उद्या जावुन अडचणीत आला किंवा काहीही म्हणु शकता की, तर या शहराचं मोठ नुकसान तुम्हाला आम्हाला हे सगळं पाहावं लागतं. कुठेतरी एक नियोजन करतांना की, आज मला सांगा ज्या वेळी राज्य शासनाने घोषणा केली की, त्याला १५ दिवसाचा कालावधी पुरेसा असता की, राज्य शासनाने घोषणा करण्याच्या वेळेला या शहराच्या विकास कामांना १५ दिवसाच्या आत कामाच्या प्राथमिकता तयार होऊन जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत मध्ये तयार होऊन त्या कामांना मान्यता मिळाली असती. बघा काय असत, ज्या वेळेला आम्ही सत्तेत होतो. त्यावेळेला जर कोणी ही कामं PWD च्या माध्यमातुन ही कामे मंजुर करण्याच कोणी आग्रह धरला असता, तर ती वस्तुस्थिती आम्ही समजु शकलो असतो. परंतु ज्या वेळेस महानगरपालिकेची सत्ता सुध्दा आपल्याकडेच आहे. राज्य शासन सुध्दा आपल्याकडेच आहे. आणि अश्या परिस्थिती मध्ये आपल्या म.न.पा.च्या सक्षम प्राधिकरणावरती अविश्वास दर्शवुन, ज्या वेळेला ही कामे मंजुर करण्यासाठी आली होती. त्यावेळेला सुध्दा मी हा मुद्दा उपस्थित केलेला होता. शेवटी इथला स्थानिक प्रशासनवर तुमच आणि आमच अंकुश आहे. PWD च्या तिथे तुम्ही जाऊन बोलाल. तर आपण तिथे Authority म्हणुन नाही. त्याच्या मुळे तितक Respect किंवा गतीची भुमिका तिथे कामाला उपयोगी पडत नाही. परंतु या प्रशासनावर तुमच आमच एक वचक असतो धाक असतो आणि understanding असते. परंतु निव्वळ या एका चुकीच्या धोरणामुळे आज या परिस्थितीने आपल्याला सामोरे जाव लागत आहे. या गोष्टीच दुख वाटत आहे. निधी आणण्याचे प्रयत्न करु त्या बद्दल दुमत नाही. परंतु कुठेतरी अश्या पध्दतीने एका चुकीच्या नियोजनामुळे, बघा कस आहे. जवळ जवळ १६ महिने निधी आपल्याकडुन Utilize नाही. राज्य शासनाकडे पण वेगवेगळया Priorities असतात. एखाद्या माणसा समोर पाच पकवानाने भरलेल ताट वाढलेल आहे आणि एकीकडे कुपोषीत बालक बसलेल आहे. हा व्यक्ती खात नाही याची खान्याची इच्छा नाही. तर नाइलाजाने समोरचा व्यक्ती काय म्हणेल याला गरज नाही म्हणुन हा ताट उचलुन या कुपोषीत बालकाला द्याव. तश्या पध्दतीने १६ -१६ महिने निधीच नियोजन होत नसेल तर शेवटी राज्य शासन या संदर्भातली भुमिका घेईल की या महानगरपालिकेला या निधीची आवश्यकता

नाही.हे एकंदरीत दिसुन येत. त्यांनी २५ कोटीच्या निधीच्या संदर्भात सुध्दा, मागच्या काळात मला जायच नाही. त्याबाबत सुध्दा असच झालं. त्यावेळेला आम्ही सत्तेत होतो. परंतु त्याच श्रेय आम्हाला मिळु नये म्हणुन २५ च्या कामांना बराच वेळ लागला. परंतु दुर्देवाने त्याच्यातला सुध्दा काही निधी अखर्चीत पडलेला आहे. आज जवळ पास त्या ट्रॅफिक गार्डनच काम रद्द होऊन साधारणता ५-६ महिने होऊन गेले. आता पर्यंत त्याच कुठेतरी नियोजन होणे गरजेच होतं. कुठल्याही विकास कामात करा. अस नाही की आमच्याच वार्डात करा, सत्ताधाऱ्यांचे प्रभागात करु नका अस काहीच नाही. कुठेही करा परंतु योग्य वेळेमध्ये त्याच नियोजन नाही झाल तर पुनश्च अशी परिस्थितीला आम्हाला सामोरे जावे लागत आहे. काही कामांच्या बाबतीत त्यांनी कार्यादेश दिलेले आहे. परंतु काम करण्याच्या संदर्भात त्यांनी असमर्थता दर्शविलेली आहे.त्याचही एक कारण अस आहे की, २५ कोटींच्या कामांची मुदत जी आहे ३० नोव्हेंबरला संपुष्टात आलेली आहे. ज्या वेळेला मुदत संपुष्टात आल्यानंतर ज्या व्यक्तींकडे आता कार्यादेश आहे. ते काम करण्याच्याबाबतीत धजवत नाही. का जर कधी या राज्य शासनाने किंवा प्रशासनाने त्याला मुदतवाढ नाही दिली तर ही केलेली कामांच मोबदला मिळेल परंतु तो महानगरपालिका निधीतुन. आणि आपण प्रशासनामध्ये आता या पध्दतीच्या सुचना दिल्या जातात की आम्हाला तसा लेखी Undertaking द्या. सदर कामांना मुदतवाढ न मिळाल्यास ही कामं म.न.पा. निधीतुन केली जातील आणि म.न.पा. निधीतुन उपलब्धता होईल. ती आम्हाला मान्य आहे अश्या पध्दतीच Undertaking घेतल जात आहे. त्याच्यामुळे ते कॅन्ट्रॅक्टरही संभ्रमणावस्थेत आहेत. एखाद्या विषयाची मुदतवाढ घेण्याच्या दृष्टीकोनातुन आणि ज्यावेळेला मुदत संपुष्टात येवुन जाते . तोपर्यंत आपण त्यावर मुदतवाढ मिळवु शकत नाही. हाही कुठेतरी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. याचा या शहराचा हा मोठया प्रमाणात निधी येतो , कामं मंजुर होतात परंतु कामं दिसत नसल्या कारणाने नागरीकांच्या रोषाला तुम्हा आम्हाला सर्वांना सामोरे जावे लागते. तर हा अत्यंत गंभीर असा विषय आहे. आपण याच्यामध्ये व्यक्तीगत स्वारस्य घेताहेत आनंदाची गोष्ट आहे. योग्य पध्दतीने आपण पाठपुरावाही करताहेत. त्याबद्दलही काही वाद नाहीये. परंतु भविष्यात अश्या पध्दतीच्या कुठेतरी चुकीचा आग्रह की कामं या विभागाकडुन व्हावं किंवा याच विभागाकडुन व्हावं अशा गोष्टींकडे आपल्याला कटाक्षाने लक्ष द्यावं लागेल.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय , अमृत योजनेचं काम जवळ जवळ मागच्या वर्षापासुन आता १६ तारखेला त्याची मुदत संपली. आता अमृत योजनेच काम केव्हा चालु होणार आहे.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** सभापती महोदया, कालच अमृतच्या कॅन्ट्रॅक्टर सोबत बैठक झाली. आयुक्त साहेबांच्या अधिपत्या खाली बैठक झाली. त्यांनी कामाला सुरुवात केलेली आहे. काही ठिकाणी जस एम.जे.कॉलेजच्या पाठी मागचा भाग, मेहरुणचा भाग या भागांमध्ये त्यांनी काही काम चालु केलेले आहे. ईएसआर च पण आणि शिवाजीनगरच्या पाठीमागचा भाग सिमेंट वगैरे काल टाकलं आणि सुरुवात करणार आहे. त्यांनी सांगितल की, उद्या चार एजन्सी येत आहे. आणि असे एकुण आठ एजन्सी मिळुन आम्ही काम पुर्ण करु. कामाला स्पिड देण्याचा प्रयत्न करु.

**मा सभापती :-** प्रशासन म्हणुन आपण याची गती वाढावी याची दक्षता घ्या.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** जवळ पास दोन तास बैठक चालली त्यात आपले काही अडचणी त्यांचे काही अडचणी असतील तर त्या दोन तीन दिवसांत सोडवायला प्रशासनाला आयुक्त साहेबांनी सांगितले आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महादेय , प्रभाग क्रं. १ , प्रभाग क्रं.२ ग्रेडींग चं काम सुरू आहे, काही ठिकाणी अमृतचं कामं चालु आहे. काही भागामध्ये अमृतचं काम चालु आहे. आता ज्या पध्दतीने रोड खोदायचे काम करता आहेत. इमरजन्सी कामं करताहेत इमरजन्सी ते बुजविता पण आहेत. त्याच्याबरोबर काही नळ कंनेक्शन टाकले गेले किंवा दिले गेले तर आपण भविष्यात रोडाचेपण कामं चालु होतील. अध्यक्ष महोदय तुम्हाला आमची एवढीच विनंती आहे की ग्रेडींगचे जे कामं सुरू आहेत त्याच्या बरोबरचं अमृत चे काम जे काम आहे आणि ज्या ठिकाणी अमृत चे कामं कनेक्शन देवुन झालेले आहेत हातोहात झाले तर ते बरं राहील . कारण का यांनी सांगीतले आहे की टेस्टींग झाल्या शिवाय कनेक्शन देता येणार नाही.टाकीच नाही तर टेस्टींग कुठुन होणार आहे. टाकीचं बांधलेली नाही तिथं . शिवाजी नगरमध्ये पाण्याची जी टाकी बांधताहेत. ती अजुन पुर्णच झालेली नाहीये . अपुर्ण अवस्थेत पडलेली आहे. कधी त्याची टेस्टींग होईल . टाकी बांधल्यावर आता त्याला किती दिवस लागतील.तो पावेतो अमृत वाला तर निघुन जाईल आमच्याकडुन मग वापस लोकांनी गड्डे खोदायचे का याला जबाबदार कोण राहील.

**मा सभापती :-** याचं नियोजन कसं राहील , याचं नियोजन आपण कश्या पध्दतीने करणार आहात.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** याच्या बाबतीत चर्चा झालेली आहे की , संबंधित कनिष्ठ अभियंता जे आहेत त्यांच्यावर ती संपुर्ण जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे . त्यांना प्रॉब्लेम काय आहे की आपण त्यांना मागे सजेस केलं होतं की , नागरीकांच्या पावत्या बघायच्या आणि त्यांना कनेक्शन द्यायचं आणि तो आमचा जॉब नाहीये. तुम्ही आम्हाला सांगा की या लाईनी मध्ये हे हे दहा घरं आहेत . त्याचे कनेक्शन देतो त्याची जबाबदारी आम्ही घेतो . संबंधित कनिष्ठ अभियंत्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे तुम्ही यांना मदत करा हे जेव्हा नळ कनेक्शन चालु करतील तेव्हा तुम्ही त्यांच्या सोबत जायचं आणि दाखवुन देवुन सांगायचे की हया हया लोकांना तुम्हाला नळ कनेक्शन द्यायचे आहेत.अशाप्रकारे ते काम करतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भोळे साहेब तुम्ही नळ कनेक्शनचे सांगताहेत . तुम्ही नविन नळ कनेक्शन चं सांगाताहेत की जुने कनेक्शनचं सांगताहेत .आता अमृत चं काम सुरू आहे अमृत चं पाणी चालु होईल. ती टाकीचं पुर्ण झाली नाहीये तर तुम्ही सप्लाय कुठुन जोडणार आहे.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** भाऊ आपण फक्त कनेक्शन त्याच्या घरापर्यंत काढुन ठेवताहेत. ते कनेक्शन बंद राहणार आहे. ते कनेक्शन म्हणजे जोडणार नाही. कनेक्शन इएसआर चार्ज करु त्यावेळेस पैसे घेतले जातील ज्या वेळेस त्यांच्या घरी पाणी येईल. आज ते हॅंडरोलीक टेस्टींग का घेत आहे ठिकठिकाणी की, पाणी सोडल्यानंतर पाणी कमीतकमी त्या लेव्हलला पाणी जात आहे की नाही ते चेक करत आहे ते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** टेस्टींग जुन्या टाकीने की नव्या टाकीने.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** ज्या प्रमाणे स्कीम झालेली आहे. त्याच प्रमाणे Implement होईल ती जुन्या टाकीला जोडण्याच विषयच नाही.

**श्री.नितीन लढढा :-** जे डिझाईन असेल त्या डिझाईन प्रमाणेच काम होईल

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** हो

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपल म्हणण तेच आहे भाऊ टेस्टींग घेऊन नळ कनेक्शन द्या तुम्ही.

**श्री.नितीन लढढा :-** ते तेचं पाईपलाईन चं टेस्टींग घेताहेत आणि कनेक्शन जे आहेत ते जे काही डिझाईन मध्ये ठरलेले आहे त्या पध्दतीनेचं जोडणी होईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगरचं काम लवकरात लवकर सुरू करा कारण त्या भागांत ड्रेनेजचे काम सुरू आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती महोदय , उपायुक्त साहेब , दोन दिवस झाले आरोग्याचं काम बंद आहे आमच्या वॉर्डामध्ये त्याचं काय आहे. साफसफाई , नाले काढणे टोटल काम बंद आहे दोन दिवस झाले .

**श्री.एच.एम.खान, आरोग्य अधिक्षक :-** मक्तेदाराने ते पेमेंट न केल्यामुळे त्यांने काम कालपासुन , मक्तेदार आला होता ईकडे तेव्हा कालपासुन त्यांनी काम बंद केलेले आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मक्तेदाराने केले आहे की कर्मचाऱ्यांनी काम बंद केले आहे.

**श्री.एच.एम.खान, आरोग्य अधिक्षक :-** कर्मचारी पगारा अभावी कामावर येत नाहीये. त्यांना पगार दिला नाही .

**श्री.नितीन बरडे :-** साहेब मला एक सांगा हे पेमेंट साठी दबाव आहे का तुमच्यावर हा , कर्मचाऱ्याचा आणि तुमचा काही संबंध नाहीये त्यात ,

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** आपला मक्तेदाराशी संबंध आहे. कर्मचाऱ्यांशी नाही .

**श्री.नितीन बरडे :-** मग काल कर्मचाऱ्यांचा मोर्चा आला कसा. ठेकेदारांच आणि कर्मचाऱ्यांच काही मनपाशी संबंध आहे का मग मोर्चा इतपर्यंत का आला.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** मी काल त्या कामगारांना स्पष्ट केल. तुमच्या पेमेंटबाबत तुमच आणि आमच काही ठेट संबंध नाही. तुम्हाला जर पेमेंट किमान वेतनानुसार मिळत नसेल किंवा कमी मिळत असेल. तुम्ही आम्हाला पत्र लेखी स्वरुपात द्यायला पाहिजे. पण तुमचं पेमेंट मिळत नाही. तर याबाबत तुमच संबंध ठेकेदाराशी आहे. ते आमच्याशी नाही ते काल मी त्यांना स्पष्ट केल.

**श्री.नितीन बरडे :-** आता जर दोन दिवस काम बंद झाले तर स्वच्छतेच कस होणार.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** काल लोक नव्हती पण काल संध्याकाळी त्यांनी आम्हाला सांगितल की, आमचे लोक उद्या हजर राहतील आजही सकाळी त्यांच्याकडुन माहिती घेतली की, लोक कामावर आहे.

**श्री.नितीन बरडे :-** बंद आहे साहेब.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** त्यांनी मला चुकीची माहिती दिली पण मी आज सकाळी सांगितल कारण ही वस्तुस्थिती आहे कारण आमचे जे सी.एस.आय. आहे त्या वार्डचे ते सांगत आहे की, काम बंद आहे आणि आम्ही त्यांना आज संध्याकाळी नोटीस देऊ. नोटीस देऊन आम्ही खुलासा घेऊ.

**श्री.नितीन बरडे :-** आता पुर्ण दिवस काम बंद आहे. तर याचा दंड कसा आकारणार आहे तुम्ही. कामगाराचा दंड आकारणार तुम्ही रु.५००/- प्रमाणे, घंटागाडीच रु.२०००/- प्रमाणे, आता पुर्ण प्रभागात गटार ही निघत नाही आणि झाडु ही मारली जात नाही.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** याचाही दंड आणि त्याला वेगळ ही दंड आम्ही आकारु. कारण लेबर न-पुरविणे, ड्रायव्हर न-पुरविणे हे झालं एक दंडाचा भाग. आणि त्याबाबत जे परिणाम होत त्याची कार्यवाही करु आम्ही त्याच्यावर.

**श्री.नितीन बरडे :-** माझ्या मते तो दबाव आणत आहे तुमच्याकडे कर्मचारी पाठवुन.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** आम्ही दबाव घेण्याच काही कारण नाही.

**श्री. विष्णु भंगाळे :-** दबावाच याच्यासाठी म्हटल जात आहे की, मोर्चा आणतांना त्याच्यात अस व्यक्तीमत्व आहे की, जो त्याने स्वत: मॅनेज केला आणि स्वत: इतपर्यंत मोर्चा आणला. आणि तो स्वत: येत आहे ज्यानी येथे ठेका घेतलेला आहे.कर्मचाऱ्यांच पगार द्यायच काम त्याच आहे. तुम्ही सांगितल्या प्रमाणे. मग हा दबाव कश्यासाठी आणतो. अक्षय नावाच व्यक्तीमत्व कोण आहे जो त्यांची सगळी Arrangement and Management करतो. हा कोण आहे जो त्या ठेकेदाराला

नेहमी मदत करतो. काय भानगड आहे ही आपल्या समोर यायला पाहिजे. आज आपले प्रवक्ते, म.न.पा.चे आरोग्याधिकारी ॲडमीट आहे. कश्यासाठी ॲडमीट आहे त्यांना काय झालेल आहे. आज श्री.निमाडे साहेबांनी व्हि.आर.एस. घेतलेली आहे. आज मी तुम्हाला सांगतो, अत्तरदे साहेब रजेवर गेलेले आहे. ते पण ॲडमीट झालेले आहे. म्हणजे नेमक काय कारण आहे जर अधिकारी सारख व्यक्तीमत्व अस जात असेल. हे काम करणारे व्यक्तीमत्व जात आहे याचा अर्थ काय ? म्हणजे रुपरेखा जागत नाही का आपल्या आरोग्याची. आपण आम्हाला माहिती देत असतांना मागिल झालेल्या खर्चाच नियोजन म्हटल तर अशी परिस्थिती आहे की आपण जो खर्च आपण मागील काळामध्ये रु.६१ लाख ६९ हजारामध्ये जळगांव शहरची साफसफाई होत होती. याच्यापेक्षा चांगली होत होती आपल जळगांव शहर सुध्दा सांगेल. आणि आज १ कोटी १९ लाख इतका खर्च होत आहे. तरी आपली बोंब आहे. म्हणजे तुमच दिलेल दंड वजा करुन १ कोटी १९ लाख रुपये खर्च करतो आपण. चांगल काय आहे साहेब, म्हणजे कस झाल माहिती आहे का? त्याला नोटीस द्यायची तुम्ही उत्तरपण तुम्ही लिहुन द्यायच. अशी माहिती आम्हाला मिळालेली आहे.शब्दरचना जर बघितली तर त्या भाषा मध्ये त्याला दंडाच दिलेल उत्तर आहे. तुम्ही किती दिवस त्यांना मुदत द्याल. तो खुशाल आज पेपरात दिलेल आहे. त्याच वाक्य वाचल का तुम्ही. लोकमत पेपरला वगैरेला दिलेल आहे त्याने. मला अडवणुक केली जात आहे. जाणुन मला टारगेट केल जात आहे. याचा अर्थ काय ?

**श्री.नितीन बरडे :-** काम न करता पैसे द्यायचे त्याला फुकटं.

**श्री. विष्णु भंगाळे :-** म्हणजे तो पेपरला देतो , खुशाल त्याला अडचणीत आणण्याच्या दृष्टीने केलं जातयं , म्हणजे हा मुद्दा काय आहे. म्हणजे हा ठेकेदार जर त्याप्रमाणे वागतचं नसेल , जर आपण पेपराला अनुषंगुन आपण जर हे केलं तर नेमकं करायचं काय, म्हणजे त्याची हिमंत ऐवढी वाढलीय की तुम्ही जर मला अडवत असेलं हे ठेकेदाराचं काम आहे साहेब, आणि आम्ही दरवेळेस सांगुन सांगुन कितीदा सांगायच्या या गोष्टी

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** काल त्यांचा जो मोर्चा आला , काल मी पहिल्यांदा मी हि भुमिका स्पष्ट केली की तुम्हाला पगार मिळत नाही हा जो विषय आहे तो महापालिकेशी संबंधित नाही . तो विषय ठेकेदाराशी संबंधित आहे. ठेकेदाराचा जो प्रतिनिधी होता त्यालाही मी तेथे सांगायला सांगीतले की ती पगाराची जबाबदारी कोणाकडे आहे. मग त्याने ते मान्य केलं की ती पगाराची जबाबदारी ठेकेदाराची आहे. दुसरा एक मुद्दा आहे की , मी कर्मचाऱ्यांना सांगीतले की तुम्ही जर मोर्चा घेवुन आलेला असाल तर तुमचं जर तुम्हाला किमान वेतना प्रमाणे पेमेंट मिळत नसेल , पुरेसे मिळतं नसेल , पी.एफ बाबत जर काही असेल तर तुम्ही ते मला लेखी स्वरुपात द्या . म्हणजे आम्ही ठेकेदाराला विचारणा करू .आणि नसेल त्याने पुर्तता केली तर आम्ही त्याच्यावर कारवाई करू. आता त्यांनी मोर्चा येथे आणल्यानंतर आम्ही कोणत्याही स्वरूपाचा दबाव घेतलेला नाही. मी माझ्या वतीने तो मोर्चा हँडल केला .

**श्री. विष्णु भंगाळे :-** साहेब म्हणता आहेत, परंतु माझ्या माहिती नुसार त्या मोर्च्याच्या नंतर त्याचे बिल देण्याच्या प्रयत्नात आपलं प्रशासन आहे . या सभागृहाचे उपमहापौर यांनी स्पष्टपणे त्याला पत्र दिलेलं आहे. की त्याची शहानिशा झाल्याशिवाय किंवा त्याच्या सर्व अटी शर्ती पुर्ण झाल्याशिवाय त्याला पेमेंट देवु नये. परंतु आपल्याच अधिकारातील काही अधिकारी अशा अधिकाऱ्यावर असेल. किंवा लिपीकांवर असेल किंवा हे पगार देण्यासाठी ही रूपरेषा आखतात. हे क्लीअर घ्या. हे कामं त्याचं आहे त्याने ज्याप्रमाणे मक्ता घेतला त्याप्रमाणे त्याने मक्ता घेतला आहे त्याप्रमाणे त्याला पेमेंट मिळणार आहे. आज नाही तर उद्या देणारं आहेत. जर त्याने व्यवस्थित त्याने कामं केलं जळगांव शहराचं तर आम्ही म्हणतं नाही . जर जळगांव शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवलं . तर त्याला पेमेंट द्यायला ज्या अटी शर्ती नुसार आमचं काहीचं म्हणण नाही. परंतु हे किती दिवसं अशाप्रकारे चालणारं आहे. याच्यावर आपणं सांगावे.

**श्री.नितीन बरडे :-** जेवढं एकंदरीत कामं केलं तेवढेच पेमेंट त्याला द्या. मी तेचं म्हणतोय तो कामं करतं नाही काही ठिकाणी आणि त्याचं पेमेंट काढतात.

**श्री. विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , अर्ज देवुन मी ही माहिती मागीतली आहे. याच्यात खुप मोठा फरक आहे. जर मागील काळामध्ये कचऱ्यांच्या गाडयांचे वजन स्पष्टपणे याच्यात क्लीअर दिसतं की नऊ नऊ , दहा दहा, अकरा अकरा टन अशा प्रकारे भरलं जातं. आणि ऐवढी कॅपेसिटी अकरा टन त्याचं वजन असु शकत का ? या गोष्टीची सुध्दा याच्यात नोंद आहे. आणि मी आपल्याला विविध मागण्या केलेल्या होत्या. प्रशासनाने मला त्याचं उत्तर सुध्दा पुर्ण कंम्पलीट दिलेलं नाहीये. मला पत्र देवुन महिना झाला. काल परवा मला दिल्यानंतर सुध्दा त्याची माहिती कंम्पलीट नाहीये. दंडवते साहेब नाही एकतर तुम्ही आयुक्त साहेब नाहीत तर मी सभापती महोदयांना विनंती करतो, आज आयुक्त साहेब नाहीयेत. आज तिसरी मिटींग आहे. म्हणजे आज असे काही होईल की आम्ही बोलतं असतांना साहेबांसमोर काही समस्या लवकर हे होतीलं की काही प्रमणात, उपायुक्त साहेब म्हणतातं की साहेबांशी चर्चा करून बोलतो. परत प्रॉब्लेम येईल. नेमकं घडत काय आहे. या बाबतीचा खुलासा वाहन चालक किती दिले. याची लिस्ट मला दिली नाही. याच्यामध्ये कंम्पलीटली म्हटंलेलं आहे की प्रभाग वाईज मक्तेदार, आता काही प्रभागामध्ये कर्मचारी आहेत याची हजेरी कोणं घेतं. हयाचं आपण आम्हाला सांगांव. हा हा प्रभाग आहे याच्यावर कर्मचारी नाहीत कामावर, किंवा काल पासुन कोणत्या कोणत्या याच्यात कर्मचारी कमी आहेत. आणि हजऱ्या कश्या प्रकारे लावत आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** मा.सभापती, आरोप केल्याच्या अनुषंगाने आम्ही कुठल्याही प्रकारचा दबाव त्या बिलासाठी त्या मोर्चाचा घेतलेला नाही. त्यांनी आमच्याकडे जे बिल सादर केलेल आहे आणि उपमहापौर साहेबांनी सुध्दा काही जोडपत्र

बिलाच्या संदर्भात दिलेले आहे. त्यावर आम्ही सविस्तर टिप्पणी तयार करुन मा.आयुक्त साहेबांकडे ठेवु आज उद्यामध्ये. परंतु त्यांनी मोर्चा आणला म्हणुन आम्ही बिल तयार केल अस काही भाग नाही.आमच्याकडे बिल सबमीट झाल आहे त्याच्या पुर्तता बाबत आम्ही त्याला वेळोवेळी कळविलेल पण आहे. त्यांनी जर पुर्तता करुन ठेवली असेल तर आम्ही ते बिल पुढील प्रक्रियेसाठी सादर करु. महापालिकेतला आमच्या विभागाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी त्यांना कोणत्याही त्यांच्या फेवर मध्ये असलेली सुचना करत नाही. आम्ही आतापर्यंत त्याला जे नोटीसा दिल्या त्याच एक कमप्लायन्स आम्ही काल केलेल आहे. दोन नोटीसांच त्याच लेखी उत्तर आलेल नाही. म्हणजे त्याच्या कामातल्या ज्या त्रुटी असतील, लेबरच्या संदर्भात जो कमप्लायन्स करायच आहे. त्याने जो कमप्लायन्स केल. ते पि.एफ.च्या संदर्भात आणि बँक खाते ओपन करुन त्यांना पगार देणे. याबाबत काल आम्ही मुख्यलेखापरिक्षकांशी सुध्दा चर्चा केली. आणि त्याला तश्या सुचना दिल्या की, आम्हाला काय कमप्लायन्स पाहिजे. दुसरा मुद्दा असा आहे की, साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला की, मागच्या मिटींगला केल होत की, वजन वाढत आहे. याबाबत पुर्वी मी टिपर चेक केले होते. मागच्या आठवडयात आरोग्य सभापती श्री.सनकत साहेब आणि आम्ही कचरा डेपोवर ९ वाहने आम्ही स्वत: चेक केलेले आहे. ट्रॅक्टर वाहने होते ती. त्यात खाली कचरा ओपन करुन ही पाहिल. कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन. त्यात कोणताही अस वजन वाढविण्यासाठी मटेरिअल आम्हाला दिसल नाही. ९ गाडयांमधुन अस काही आढळुन आलेल नाही.

**श्री नितीन बरडे :-** साहेब, उपमहापौर व सभापतींच फोटो आहे एक दिवसाचा.

**श्री. विष्णु भंगाळे :-** साहेब वजन वाढण्यासाठी काही केलेलं नाही .मी स्वत: एक क्लीप केलेली आहे कलेक्टर ऑफीस ची मी त्याचं उत्तर मागीतलेलं होतं . प्रभाग क्रं. ६ चा भाग येत असेल तो वन विभागाच्या भिंतीला लागुन असलेला मातीचा भुगुलं अक्षरश: झाडांना टाकण्यात येणारी माती आताही माझ्याजवळ क्लीप आहे ती तुम्ही म्हणतात की कचरा भरतात . आता हे काही आपण ते हे लावयचं का ?

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही नाही तसं काही नाही माझ्याकडे ज्या काही तक्रारी आल्यातं मी त्यांची दखल घेतलेली आहे.

**श्री. विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय, मी मागच्या मिटीगंला सुध्दा आयुक्त साहेब असतांना हा प्रश्न विचारला होता . मी आपल्याला क्लीप पाठविलेली आहे. आपण याच्यावर काय केलं. मी त्याच्यानंतर प्रश्न टाकला . त्याच्यावर सुध्दा आतापर्यंत कारवाई झालेली नाही. आजही माझ्याकडे रेकॉर्ड ला त्याच्यावर कारवाई झालेली आहे. असं दिसत नाही. हे याच्यात स्पष्ट म्हटंलेल आहे की त्या प्रभागाचं नांव , त्या जागेचं नांव सुध्दा दिलेलं नाही .की यासाठी ही कारवाई किंवा हा दंड झालेला आहे. म्हणजे नेमकं काय आहे आपण करता काय आहे . माती भरलेल्याचं प्रुफ आहे. रेकॉर्डींग आहे . सर्व आहे तरी सुध्दा अजुनही त्याच्यावर कारवाई होतं नाहीये. म्हणजे काय समजणार मग आणि तुम्ही खुशाल सभागृहामध्ये सांगाताहेत की तो तसं करत नाही. म्हणजे आम्ही काय समजायचं म्हणजे जळगांव महापालिकेचे नगरसेवक , त्या वेळेस तीन नगरसेवक होते आम्ही मी होतो , सुनिल भाऊ महाजन होते , विरोधी पक्ष नेते होते आणि जळगांव महानगर शिवसेनेचे प्रमुख शरद तायडे माजी नगरसेवक आम्ही स्वत: तीन व्यक्ती त्या ठिकाणी होते. एकावेळेस उपमहापौर आणि त्याच्या सोबत असलेल व्यक्तीमत्व त्याठिकाणी होत. त्याच्या घटना आणि याच्या मागील घटनांचा अंदाज आम्ही सभागृहाला ज्ञात केलं होतं. की कलेक्टर सारखा महोदय धुळयामध्ये पकडल्यानंतर सुध्दा त्या कॉन्ट्रक्टरवर फरक पडत नाही. आम्ही याच कारण काय समजायच .

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** याच्यामध्ये कॉन्ट्रक्टर माती भरत नाही असं माझं म्हणणं नाही. ज्या काही तक्रारी आमच्याकडे आल्या त्याला आम्ही दंड लावलेला आहे. आपण जो काही मुद्दा उपस्थित केला तो मी आरोग्याधिकाऱ्यांना विचारून घेतो. कारण मी त्यांना हा मुद्दा दोन वेळा रिमाईंड केला की तो जो काही शाहु हॉस्पीटल .

**श्री. विष्णु भंगाळे :-** शाहु हॉस्पीटल च्या जागेवरचा एक मुद्दा होता. कलेक्टर ऑफीसच्या समोर दुसरा मुद्दा होता.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** बरोबर .

**श्री. विष्णु भंगाळे :-** हे दोघ मुद्दे मी मांडलेले होते. त्याच्यावर तुम्ही दंड आकारलेला नाही. आणि घंटागाडी चा ड्रायव्हर सुटी वर असल्यास किंवा घंटागाडीवर नसल्यास त्यामुळे घंटागाडी फीरत नाही . तर त्यावेळेस आपलं उत्तर काय मिळालं माहिती आहे का ? आपण असे म्हणता की आम्ही आपल्याला लालुच देण्याचा प्रयत्न करतो आणि तुम्ही काय म्हणता की आम्ही त्याच्याशी पत्र व्यवहार करू आणि मत मागवु .म्हणजे साहेब आज जर त्या घंटागाडीवरील ड्रायव्हर जर आले नाहीत. तर तुम्ही पत्र व्यवहार कराल आणि मत मागवाल . आणि मग तो पत्र व्यवहार किती दिवसांत होईल आणि घंटागाडया कधी येतील.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** हे जे काही आहे ना.

**श्री. विष्णु भंगाळे :-** ही माहिती तुमच्या कार्यालयातुन आलेली आहे. आज आपले आरोग्याधिकारी नेमके ॲडमिट झाले कशा कारणासाठी झाले माहिती नाही . पण त्याच्यावर त्याची सही आहे .

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** त्यांनी जी काही माहिती आपल्याला दिली आहे. ती माहिती मी तपासुन घेतो मला त्यानी ती माहिती दाखविलेली नाही. पण कलेक्टर ऑफीस असेल , शाहु हॉस्पीटल असेल ते मागच्या मिटींगमध्ये ते मुद्दे लिहुन घेतलेले आहेत. मी आमच्या आरोग्याधिकाऱ्यांना सांगीतले की हे तपासुन त्याच्यावर त्याला नियमानुसार दंड लागु झाला पाहीजे. बजरंग बोगद्याचा विषय असेल तर आम्ही यापुर्वी तेथे तीन वाहने पकडली . त्याचाही दंड लागु झालेला आहे. माझा

सांगायचा मुद्दा असा होता की तो माती भरत नाही असे माझे म्हणणे नाही. परंतु जो मुद्दा उपस्थित झाला त्या अनुषंगाने त्यावेळी सभापती साहेब आणि आम्ही काही वाहने आम्ही तपासली. त्याच्यामध्ये आम्हाला काही आढळुन आल नाही. इतर ठिकाणी जर काही वाहने असतील तर वेळोवेळी आम्ही त्याचीपण तपासणी करु. परंतु त्याला माफी म्हणुन कुठल्याही प्रकारचे फेवर करणार नाही.

**श्री. विष्णु भंगाळे :-** यांनी मागच्या मिटींगमध्ये ही सभापती महोदया, सक्षम अधिकाऱ्याचे नियोजन करु अस म्हटल होत. नेमक सक्षम अधिकारी म्हणजे कोण. काय मला याच सुध्दा उत्तर याच्या माध्यमातुन हव आहे. आजच्या तारखेला आपण आमच्या प्रभागामधले जे कर्मचारी कमी केले आहे ते सुध्दा आता पर्यंत दिलेले नाही. गोलाणी मार्केट असेल, फुले मार्केट असेल, ३० कर्मचारी आजही कमी आहे. त्याबाबतचा ही खुलासा आम्हाला आजपर्यंत झाला नाही. मला ह्या तीन गोष्टींच खुलासा आता या सभागृहात द्यावा. कारण काय आहे. आपण दुसरा विषय आला की त्यावर चालले जातो. आरोग्याधिकारी, अत्तरदे साहेब आणि नेमाडे साहेब व्हि.आर.एस. का घेतील अत्तरदे रजेवर का गेले हे का जात आहे. याच कारण काय ? म्हणजे आपल्या कर्मचाऱ्यांना आपलेच लोक त्रास देत आहे का काही गोष्टींसाठी ? असे जे व्यक्तीमत्व आहे ते कारण नसतांना उलट ते काम चांगले करतात, माझ्या माहितीनुसार, सभापती महोदया हे तुम्ही चांगल ठेवलेले आहे अढावा घेणेबाबत मी म्हणेल मागच्या मिटींगला आम्ही काही समस्या मांडल्या होत्या हॅन्डपंपाच्याबाबतीत, पाणीपुरवठा असेल खडके साहेब असेल त्यांचा भाग असेल नक्कीच त्यांनी त्या दोन हॅन्डपंप चालु करुन त्यांची दुरुस्ती केली सुध्दा. मागे मी बजरंग पुलाच्या बोगद्याबाबत मी बोललो होतो. त्या ठिकाणी भोळे साहेबांनी जे.सी.बी. लावुन त्या भागाला जे रोड होत त्याच नियोजन केल. आमच एकच म्हणण आहे सभापती महोदया, शहराच्या दृष्टीने ज्या काही गोष्टी आहे. जाणे येणेच्या दृष्टीने असेल किंवा शाहुनगरचा जो विषय आहे. त्यांनी जर काम केल तर आम्ही सभागृहात सांगु की यांनी काम केलेल आहे. मागच्या मिटींगला सुध्दा सांगितल की जे काम झालेले आहे ते झालेत. पण हे आम्ही सांगुन सांगुन थकतो मॅडम, याच कारण काय ? मग आम्ही याच्या म्हणायच काय ? याच्यात अस वाटत की, पाणी कुठेतरी मुरत आहे.

**मा.सभापती :-** दंडवते साहेब आता होत अस आहे की, याबाबत सर्व सदस्य या बद्दल तिव्र कंमप्लेंट करत आहे. आणि सर्व पक्षीय सदस्यांची याच्याबद्दल नाराजी आहे.आपल्याकडुन मोघम स्वरुपाचे उत्तर फक्त दिली जात आहे. आता जर ते सांगत आहे की, दोन दिवसापासुन त्यांच्या वार्डातल काम बंद आहे. आता आपण म्हणत आहे, माहिती घेतो, माहिती घेऊन सांगतो. माहिती घ्या. आपण ठेकेदाराला दंडात्मक कार्यवाही कराल ही. पण या नंतरही नगरसेवकांच व नागरीकांच प्रश्न जसाचा तसाच राहत आहे. या संदर्भात सुध्दा आपल्याला ताबडतोब उपाययोजना करणे आवश्यक आहे. यापुर्वी सुध्दा आपली या विषयावर आपली चर्चा झाली होती की आपण आपल्या कायम कर्मचाऱ्यांची टिम ठेवली पाहिजे की ज्या वेळेला त्याने काम बंद केलेल आहे. दंडात्मक कार्यवाही आपण करु यात. पण दंड घेणे इतकाच महापालिकेचा उद्देश आहे का ? दंड आकारणे, दंडात्मक कार्यवाही करणे, कागदी घोडे नाचवणे यापेक्षा ही सर्वात महत्वाच काम आहे. नागरीकांच्या समस्या संपल्या पाहिजे. रोजची स्वच्छता रोज झाली पाहिजे. यासाठी आपण आपली वेगळी टिम का उभारली नाही ? दोन दिवसापासुन यांचे काम बंद आहे. आता आपण माहिती घ्याल, उद्याचा दिवस माहिती घेण्यात जाईल. त्यानंतर आपले कायम कर्मचारी तेथे कुठतरी जातील. तो पर्यंत या सर्व नगरसेवकांनी हे सहन करायच का ? यांचाच नाही सर्व नगरसेवकांचा प्रश्न आहे. जिथे कुठे काम बंद होते. ठेकेदार त्याच्या कोणत्याही अडचणीबाबत काम बंद करत असेल. तो त्याचा प्रश्न आहे आणि त्यांनी याचा प्रश्न त्याच्या लेव्हलवर सोडवायचा आहे. त्यासाठी आपण जबाबदार नाही. आपण फक्त दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी नाही आहोत आपण काम करण्यासाठी आहोत. रोजची स्वच्छता रोज होणे हा पहिला उद्देश असायला पाहिजे.

**श्री. विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, हे दर वेळेस सांगतात की आम्ही दंड करतो, मी मागच्या वेळेस सुध्दा आकडे दिले की, ६१ लाखाच काम, १ कोटी १९ लाखात होत. दंड आकारुन आणि ते दंडाचे जर आकडे पाहिले तर ते डोळे फिरण्यासारखे आहे की ऐवढा दंड केला. दंडाचे आकडे दिसता. इतक जात असेल आणि तरी सुध्दा होत नाही. मला या दोन तीन गोष्टींचे उत्तर पाहिजे. मा.सभापती महोदया, प्रभाग क्र.१७ मला वाटत श्री.सुनिलभाऊ खडकेंचा आहे. या प्रभागामध्ये सोपान नगर म्हणुन एक कॉलनी आहे. विंडलॅण्ड वासुदेव हॉटेल समोर, ४ ते ६ महिन्यापासुन गटारींसाठी ते रस्ते खोदुन पडलेले आहे. रोडची क्रॉसींग खोदुन ठेवल्या आहेत. तिथले गटारींच का काम सुरु होत नाही. आणि सुरु झाल तर आर्धवट झालेल आहे. माझ्या माहितीनुसार दोन तीन ठेकेदार का बदललेत ? त्या वस्तीतले नागरीक हैरान झालेले आहे. आता तुम्ही जर पाहिले तर तेथील परिस्थिती रस्त्यात न जाण्यासारखी आहे. हे फोटो आहेत सभापती महोदया, मला नागरीकांनी मोबाईलवर टाकले आहेत.

**मा.सभापती :-** सोपान नगरचा खुलासा करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, त्याच्या आधी मला डॉक्टर ॲडमिट का झाले, हे रजेवर का गेले, याच ही उत्तर हव. म्हणजे साफसफाई होत नाही आणि मेन महत्वाचे लोक रजेवर जात आहे याचा ही आपण आढावा घेतला पाहिजे सभापती महोदया,

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** आरोग्याधिकाऱ्यांचा रजेचा अर्ज आलेला आहे. त्यांनी अर्जात म्हटलेल आहे की मागच्या ३-४ दिवसापासुन तब्यत बरी नसल्यामुळे आणि काल छाती दुखुन आल्यामुळे मी ॲडमिट झालेलो आहे. मला ३ दिवसाची रेस्ट आवश्यक आहे. असा रजेचा अर्ज त्यांनी दिला आहे. दुसरा मुद्दा भंगाळे साहेबांनी उपस्थित केलेला आहे की, दुसरा मुद्दा की,

मागच्या वेळेस भंगाळे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला की, आपल्या कर्मचाऱ्यांना काही वेगळा त्रास होत आहे का? श्री.नेमाडे जे आहे त्यांनी जो काही अर्ज आमच्याकडे दिलेला आहे. त्या अनुषंगाने मी त्यांना मॅसेज दिला की, तुमची काही अडचण असेल तर प्रत्यक्ष माझ्याशी बोला. या सुध्दा एक दोन जे सॅनेटरी इन्स्पेक्टर म्हणुन जे काम करत होते. त्यांचेही हे मुद्दे होते की, आम्हाला हे काम सोडुन दुसरं काम द्या. मी त्यांना ही ऑफिस मध्ये बोलवुन सांगितले की, काय नेमकी अडचण आहे. तर ते म्हणायचे की, आम्हाला कामाचा लोड होतो तर तुम्ही वेगळे नियोजन करा. म्हणजे डाबोरे आणि गोयर असे प्रभाग क्र.१ आणि २ चे होते. ते आता काम करत आहे. तसेच नेमाडेच्या बाबतीत काही विषय असेल तर मी त्यांना मॅसेज दिलेला आहे. अत्तरदे आज का रजेवर गेले मला आताच समजल त्यांनी असा अर्ज वगैरे माझ्याकडे दिलेला नाही अजुन आणि डॉक्टरांचं त्यांनी मात्र अर्ज दिलेला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, याबाबतीत यांना आता समजत. आम्ही त्यांना सकाळी ६.०० -७.०० वाजताच फोन करुन सांगतो की अशी घटना घडलेली आहे. उपायुक्त साहेब, या गोष्टींचा खुलासा सकाळी ५.०० -६.०० वाजता आपल्याकडुनच व्हायला पाहिजे परंतु तो आम्ही करतो, जेवढ आमच्या कढुन होत. पुढील काळामध्ये आरोग्य निरिक्षक अजुन सुध्दा व्हि.आर.एस. घेण्याच्या सुध्दा तयारीत आहे. आजच्या घडीत अस होईल पुढची स्टॅण्डींग येत नाही तो पर्यंत दोन जणांच अर्ज तुमच्या पर्यंत पोहचेल. ही सुध्दा माहिती आमच्या जवळ राहते. सर विश्वासात घ्या आणि काम करा.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** मी माहिती घेईन त्याची आणि त्यांच्याशी पर्सनली बोलेल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सभापती महोदया, उपायुक्त साहेब माझे सहकारी सन्मा.सदस्य श्री.विष्णुभाऊ भंगाळे यांनी या ठिकाणी आरोग्या विषयी खुप काही सांगितल. त्याच विषयी मला बोलाव अस वाटतं की, ज्या दिवसापासुन आपण साफसफाईचा एकमुस्त ठेका दिलेला आहे. तेव्हा पासुन एकही महासभा नसेल एक ही स्थायी समितीची सभा नसेल ज्यात आरोग्याचा विषय आला नसेल. आणि जास्तीत जास्त वेळ आपला आरोग्यावरच जात आहे. आपण प्रत्येक वेळेस सभेमध्ये अधिकारी सांगतात की, इतका दंड केला, कामगारांचा इतका, वाहनांचा इतका मला वाटत मागच्यावेळेस कोटीच्या वर आपण दंडाचा आकडा सांगितला. आणि प्रत्यक्षात लाखाच्या आंत आपण त्याच्याकडुन घेतले. जर आपण कोटीच दंड करत बसु. आणि लाखाच्या आत त्याच्याकडुन वसुल करु. तर तो आपल्याला जुमाणणार नाही. आणि असच जर आपण चालु ठेवल. तर याच्यात सुधारणा होणार नाही. दंड, प्रत्येक वेळा आपण दंडाचे आकडे ऐकतो. दंडाच्या व्यतिरिक्त आपण त्यांच्यावर काही कार्यवाही करु शकतो का ?

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** आपण त्याच्यावर कारवाई करू शकतो.त्याचा रिपोर्ट आम्ही म्हणजे त्याला आतापर्यंत ५ नोटीसा दिल्या आहेत. त्यापैकी त्यांनी त्रोटक स्वरूपात उत्तर दिलेलं आहे. काल की परवा सुध्दा आम्ही त्याला एक नोटीस दिलेली आहे. आणि मागच्या जनरल बॉडीच्या मिटींग मध्ये ठरल्याप्रमाणे नोटीस दिली त्याच्या एक महिन्याच्या आंत त्याच्यात जर काही सुधारणा होत नसेल. तर तो रिपोर्ट आम्ही आयुक्त साहेबांच्या मार्फत जनरल बॉडी पुढे ठेवणार आहोत.म्हणजे आपण त्याला मागे जी नोटीस दिली त्यात एक महिन्याची मुदत दिली होती.आणि पुढच्या आठ दिवसा मध्ये म्हणजे त्याचे अनेक असे आहे की , म्हणजे तो कामगार पुरवत नाही. आणि तो आजच काही काम बंद करू शकत नाही . आणि अचानक काम बंद केल्यामुळे आपल्याला त्याठिकाणी मनुष्यबळाची पर्यायी व्यवस्था करणं ते शक्य होत नाही.आता त्याचं पुर्ण काम झाल्यानंतर पर्यायी काम व यापुर्वीची जी पर्यायी व्यवस्था होती .त्याचा पर्याय आम्ही तयार केलेला आहे. म्हणजे वार्ड निहाय जे ठेकेदार होते. साठ पासष्ठ लाखावर आपण पुर्ण शहराचं काम करत होतो.आपले कर्मचारी होते, आपलीही यंत्रणा होती.तर याबद्दलची आम्ही तयारी करून ठेवलेली आहे. फक्त एका वार्डात तो लगेच विरोध करतो तर आपल्याला तिथे लगेच पर्यायी देण शक्य होणार नाही.आणि तो ही अचानक करारनाम्याच्या अटी शर्तीप्रमाणे तो लगेच काम बंद करू शकत नाही .त्याला जर करायचे असेल तर त्याने तशी नोटीसही दिली पाहीजे.आता या बाबत साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला की त्याच्यावरच्या कारवाईचा त्याच्यावर कारवाई तर आम्ही करू . सविस्तर आतापर्यंतचा या बद्दलचा रिपोर्ट मा.आयुक्त साहेबांच्या मार्फत सभेपुढे सादर करू.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण त्याला ४ ते ५ नोटीस दिल्या असे सांगीतले. त्यांनी त्या नोटीसीची उत्तर दिलं , त्या उत्तराला आपण समाधानी आहोत का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** एकच नोटीसचे उत्तर दिलं असे म्हणताहेत ते.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही तिन नोटीसचे उत्तर त्यांनी दिलेले आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण समाधानी आहोत का ?

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही त्यांनी तिन नोटीसची उत्तर दिली , त्यापैकी परवा एक नोटीस दिलेली आहे. आणि त्या आधीचं जे पत्र आहे. म्हणजे २६ तारखेला एक पत्र दिलेलं आहे. त्याचही उत्तर त्याने अद्यापपर्यंत दिलेलं नाही. अशा दोन नोटीशीचे उत्तर त्याचे बाकी आहेत.आणि दुसरा एक मुद्दा उपस्थित केला होता की , उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत पाठपुरावा होत नाही . तर आमच्या आरोग्याधिकाऱ्याकडुन बरेचशे मुद्दे विसरले जातात.कारण कालच सन्मा.नगरसेविकांनी बेंडाळे मॅडम होत्या माजी नगरसेवक विठोबा भाऊ पण होते . त्याच्यासमोरचं त्याच्याच वार्डचे मुद्दे उपस्थित करून सांगीतले . आणि एंकदरीत सांगीतले की आरोग्याधिकाऱ्याकडुन काही मुद्दयाच्या बाबत अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.म्हणजे सन्मा.सदस्यांनी ज्या तक्रारी ऑफीसला दिलेल्या आहेत.त्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मी त्यांना चार चार वेळा रिमांईडर करत

असतो. तोंडी आणि समक्ष सुध्दा किंवा एसएमएस द्वारे सुध्दा परंतु त्यांच्याकडुन काही मुद्दे दुर्लक्षित होताहेत.सभापती महोदया सुध्दा एका मुद्दावर चार चार फोन करतात त्याच बाबत जे ईथे उपस्थित केले जातात.परंतु तरीही त्यांच्याकडुन पुर्तता होत नाही .काही बाबतीत असे निदर्शनास आलं की , ते सांगातात की माणसं तिकडे घेतले आहेत.ते सांगतात की हे काम झालेलं आहे. परंतु काल महापौर मॅडमांच्या येथेही हा मुद्दा उपस्थित झाला की ते काम झालेलं नव्हतं. त्याच्यामुळे आणखी रोष निर्माण होत आहे. त्याच्याबाबतीत मी काल त्यांना खुप कडक शब्दांमध्ये सांगीतले की ,तुमच्या दुर्लक्षामुळे हा रोष वाढतो , तुमच्या दुर्लक्षामुळे ही कामांची पुर्तता होत नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** दिवसेंदिवस तुम्हाला असे वाटतं नाहीये का की ठेकेदाराची मुजोरी वाढत चालली आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** यामध्ये ठेकेदाराने ज्या गोष्टींची पुर्तता करणे आवश्यक आहे. म्हणजे सुविधा असेल किंवा यंत्रणा असेल. याच्यामध्ये त्याने जी काही सुविधा तयार करून देणे आवश्यक आहे.तो तोंडी कबुल करतो , परंतु त्याच्याकडुन त्या सुविधा किंवा त्या बाबींची पुर्तता होत नाही.आणि याबाबत त्याला आम्ही कळवलेलं आहे.सगळया गोष्ठी आम्ही पेपरवर घेतलेल्या आहेत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण तोंडीच्या ऐवजी लेखी स्वरूपात काम जर केलं तर बर राहील. अशी माझी विनंती आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही नाही , लेखी आम्ही दिलेलं आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , डी.बी.जैन , शिवाजी नगर मधील दवाखान्याचे किरकोळ कामाचे ४ लाखाच्या जवळ पासचे एक टेंडर आपण काढले होते . त्या टेंडरचे काय झाले. तिथं अजुनही परिस्थिती खराब आहे. हा आरोग्याचा विषय आहे , जाळया लावणे , साफसफाई बाबतचे एक टेंडर काढले होते साहेब , ते टेंडर प्रसिध्द झाले पण ते मक्तेदारने घेतले नाही.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** नाही ते पुन्हा मान्यतेकरीता सादर केलेले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एक वेळा टेंडर प्रसिध्द झाले होते ना .

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** आता टेंडर आलेले आहेत ते फॉरवर्ड केलेले आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपण वल्लभदास पटेल यांचा पुतळा उभारणेसाठी एक ठराव केलेला होता दि.०७/१२/२०१८ ला आणि बाळासाहेब ठाकरे यांचा २०१२ ला एक ठराव केलेला आहे. १४५२ क्रं चा त्या पुतळयांच्या ठरावाची काय पुर्तता केली आहे.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** ताई वल्लभदास पटेल यांचा पुतळयाच्या संदर्भात प्रोसेस चालु आहे. आणि शासनाची जी प्राथमिक मान्यता असते ती मिळालेली आहे. त्यानुसार पुतळा तयार झाला आहे. अशी माहिती माझ्या पर्यंत मिळालेली आहे.

**मा.सभापती :-** बाळासाहेब ठाकरेंचे काय ?

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** त्यावेळेस मला आठवत, टाऊनप्लॅनर आणि नितीनभाऊ असतील त्यांच्या सोबत, आम्ही गेलो होतो. जी जागा प्रपोज केली होती. तो ट्रँगल अडचणीचा ठरेल तर त्यासाठी दुसरी जागा सुचविण्यात यावी. कारण त्याच्या आजुबाजुला हे करता येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सन २०१२ मध्ये नितीनभाऊंनीच सह्या केलेला आहे तो विषय. त्या टाईमाला नितीन भाऊंना कळविलेले आहे तुम्हीं. आता किती दिवस झाले त्या विषयाला. ७ वर्ष होऊन गेले. जागा भेटत नाही तुम्ही आज सांगता,

**श्री.नितीन लढढा** :- दुसऱ्या ज्या जागा असतील त्या प्रस्तावीत करा आणि जेणे करुन वाहतुकीला अडथळा होणार नाही. आणि शहरातल्या योग्य ठिकाणी असायला पाहिजे लक्षात घ्या.

**श्री.एस.एस.भोळे, शहर अभियंता :-** भाऊ आपल्या पाहणी मध्ये काही असेल तर सुचवा, लवकर होईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लवकरात लवकर करा.

**श्री.नितीन लढढा** :- मा.सभापती महोदया, आरोग्यचा विषय जवळपास आपण ३ महिन्यापासुन ऐकत आहे. प्रत्येक मिटींगला याच्या बाबत मोठया प्रमाणात चर्चा होते. मला एक गोष्ट कळत नाही. या मक्तेदाराला लोकप्रतिनिधी सगळे नाराज, शहरातील सगळे नागरीक नाराज, शहराचे मा.आमदार ते सुध्दा मला खाजगी भेटले त्यावेळेला सुध्दा निवडणुकीच्या प्रचारामध्ये त्यांनी सुध्दा सांगितल की, या मक्तेदाराच्या कामाच्या दृष्टीकोणातुन मी स्वत: नाराजीचा पत्र व्यवहार केलेला आहे. मा.महापौरताईने सुध्दा पत्र व्यवहार केलेला आहे. मग अश्या परिस्थिती मध्ये साधारणता आपण बघतो. याला सुधारण्याच्या दृष्टीकोणातुन प्रशासन प्रयत्नशील होत. परंतु तब्बल आता ४ था महिना सुरु झालेला आहे. या १६ तारखेला चार महिने या मक्तेदाराला काम करण्याच्या संदर्भात पुर्ण होतील. आणि ४ महिन्यानंतर सुध्दा मक्तेदाराच्या कामाच्या सुधारणेमध्ये कुठलाच फरक पडत नसेल तर मला वाटत की, या सभागृहाने हा ठराव का नाही करुन घ्यावा की, सदरहु मक्तेदार समाधानकारक रित्याने शहराचे प्रश्न मार्गी लावु शकत नाही आणि याच्या सेवा या शहराला उपयुक्त नाही. या मक्तेदारावरती पुर्वीपेक्षा दुप्पटीने खर्च जास्त होत आहे. अश्या परिस्थितीत सुध्दा प्रशासन मक्तेदाराला का पाठीशी घालत आहे. वास्तविक ज्या वेळेला सभागृहातील संपुर्ण सदस्य, मग विरोधीपक्षाचे असतील किंवा सत्ताधारी पक्षाचे असतील किंवा आमदार असतील किंवा महापौर असतील. प्रशासनाचे उपायुक्त सुध्दा नाराजी व्यक्त करत आहे आणि अश्या परिस्थिती मध्ये या मक्तेदाराला वाचविण्यामागच गौडबंगाल नेमक काय? का प्रशासनाकडुन असा प्रस्ताव येत नाही की, सदरहु

मक्तेदार त्याचे कामे पार पाडण्यास असमर्थ आहे. मला वाटत या मक्तेदारावर जितकी मेहरबानी केलेली असेल मला नाही वाटत की, गेल्या ३० वर्षात माझ्या कार्यकाळात मी बघीतली नसेल. कुठल्या मक्तेदारावर इतक्या प्रमाणावरती मेहेरबानी केलेली असेल. मला सांगा, १०० वाहन नवी कोरी महानगरपालिकेची त्याच्या सुपुर्द करण्यात आली आहेत. बरेच ज्या मशिनरी आहे ते आपण त्याला युटिलाईज करायला देत आहोत. म्हणजे या मक्तेदाराची गुंतवणुक नेमकी काय ? जेणे करुन त्यांच्या कर्मचाऱ्यांना महापालिकेसमोर पगारासाठी ठिय्या मांडावा लागतो. अश्या परिस्थितीमध्ये मक्तेदार महानगरपालिकेच्या खिश्यातुन काढेल आणि कर्मचाऱ्यांना देईल. अश्या जर प्रवृत्तीचा मक्तेदार असेल तर मला वाटत की, आजच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये सर्वानुमते एक ठराव घेण्यात यावा की अश्या परिस्थितीमध्ये मक्तेदाराला वारंवार सुचना देऊन सुध्दा मक्तेदार समाधानकारक रित्या काम करण्यास असमर्थ असल्या कारणाने या शहराच्या नागरीकांची आरोग्य विषयाच्या संदर्भात गैरसोई होत असल्याने हा मक्ता तातडीने रद्द करण्यात यावा. आणि सदर मक्तेदाराला काळया यादीच्या सुचीमध्ये टाकण्यात यावा असा ठराव घ्यावा . कारण काय होईल. किती वेळा चर्चा करायची या विषयावरती. प्रत्येक महासभेला व प्रत्येक स्थायी समितीला मला सांगा की अनेक विषय आपल्या डोळयासमोर आहे. परंतु सर्व विषय बाजुला ठेवुन तासंतास चर्चा या विषयावर करावी लागत असेल. आणि मक्तेदार जर त्याच आज स्टेटमेंट आहे. जर स्वत: मक्तेदार म्हणत आहे की, मला महानगरपालिकेकडुन ज्या करारनाम्याच्या अनुषंगाने ज्या मुलभुत सोई सुविधा अपेक्षित होत्या त्या मिळाल्या नाही. जर मक्तेदार या पध्दतीने भुमिका मांडत असेल की पायाभुत सोईसुविधा महानगरपालिका त्याला ४ महिन्यामध्ये उपलब्ध करुन देऊ शकली नाही. मग हा मक्ता काढण्याची घाई का होती ? आम्ही ही भुमिका त्यावेळेला सुध्दा या सभागृहात स्पष्ट केली होती. की त्यावेळेला ६० लाख रूपये महिन्याच्या खर्चामध्ये जळगांव शहरामध्ये आरोग्याची संपुर्ण यंत्रणा सुकर पध्दतीने कार्यरत होती . अत्यंत आज जी परिस्थिती आहे मी निश्चितपणे सांगतो आपल्याला की पैसा वाचुन याच्या पेक्षा चांगली स्वच्छता त्या काळात होत होती. परंतु त्यावेळेला हा अट्टाहास धरण्यात आला .मग हा मक्तेदार म्हणतो की पायाभुत सोईसुविधा त्याला महानगरपालिकेने उपलब्ध करून दिल्या नाहीत.मग त्यावेळेला हा मक्तेदार का नाही आला ,की आपण आपल्या पायाभुत सोईसुविधा या उपलब्ध करून द्यायला पाहीजेत आणि नंतर मक्ता काढला असता . ज्यावेळेला जुन्या मक्तेदारची मुदत संपलेली होती. त्यावेळेला त्याला मुदतवाढ दिली असती . मुदत वाढ देण्याचे अटी शर्तीमध्ये नव्हती कारण महानगपालिकेचा पैसाही त्याच्यात वाचत होता .आणि स्वच्छता याच्या पेक्षा चांगली होत होती. मक्तेदारचे लोकमत मधील स्टेटमेंट वाचुन घ्या लागले तर, की दोन महिन्यापासुन पेमेंट थकविले आहे. महानगरपालिकेकडुन माझी अडवणुक होतेय , कोणतीही सुविधा मिळालेली नाही. कराराची कुठलीही पुर्तता झालेली नाही. काही एक चुक नसतांना आम्हाला टार्गेट केलं जातयं. आम्हाला तीन महिन्याचा कालावधी मिळाला होता तेव्हा आम्ही पुर्ण जबाबदाऱ्या पुर्ण केल्या .पण मनपा प्रशासनाला आम्हाला काम करू द्यायचे नाही असे दिसत आहे. कामगारांनी असे केले त्याच्याबाबत मनपाने करू द्या .म्हणजे असे आहे की चोरी तो चोरी उपर से सीना जोरी .

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आपण या सगळया गोष्टी ज्या मांडलेल्या आहेत . तर आपण मागच्या महासभेला नव्हतात , तर याच सगळया गोष्टींचा मागच्या महासभेमध्ये उहापोह मी स्वत: केलेला आहे. आणि आता आपण जे म्हटंल की स्थायी सभेत आपण करूया कारण काय आहे की हा स्थायी समोरचा विषय येणार नाही. हा महासभेमध्ये होणारा निर्णय आहे. मागच्या महासभेमध्ये आपण हे ठरवलेलं आहे की, सर्वानुमते ठरवलं होत की , याला आता शेवटची एक महिन्याची मुदत द्यायची आहे. आणि आपण असं म्हणतात की काय त्याला हे नाही किंवा त्याचं काम बंद आहे. तर हे सगळं आता होणार आहे. आणि पुढच्या महासभेमध्ये येणाऱ्या महासभेमध्ये आपण हा निर्णय एक मतानेच घेणार आहोत. आजच्या स्थायी मध्ये येथे फक्त प्रशासनाला या सुचना देते आहे की , येथुन पुढे ठेकेदारा संदर्भात कोणतेही आक्षेप जर आले , ऑडीट असो किंवा न्यायालय असो .तर या सगळया गोष्टींसाठी प्रशासन जबाबदार राहणार आहे. आता नितीन भाऊंनी जे मुद्दे मांडलेले आहेत . की तो पळवाटा शोधतो आहे . आणि तो सगळे मुद्दे पुढे आणतो आहे की मला सुविधा दिल्या नाहीत वगैरे या सगळया गोष्टी मी महासभेपुढे मांडल्या होत्या . याच सगळया गोष्टींचा उहापोह केला होता. की त्याच्या सगळया पळवाटा , त्याच्या आपण सगळया मान्य करतोय की हो ते आमचं फेल्युअर आहे आम्ही हे वेळेत केलं नाही.तरी या सगळया विषयांवर मागच्या महासभेत सविस्तर चर्चा झालेली आहे. आणि मला असं वाटतं की आपली मागची महासभा १५ तारखेला झाली होती .तेव्हा आपण एक महिन्याची मुदत ठरवलेली होती . म्हणजे आपली ती मुदत आता संपते आहे. तर आपल्याला पुढचा निर्णय घ्यायला पुढची महासभा निश्चितच असणार आहे. त्याचा निर्णय आपण महासभेमध्ये घेवु. या स्थायी मध्ये त्याचा याला सगळयांचाच तिव्र निषेध आहे. प्रशासनाने आयुक्तांपर्यंत , आज आयुक्त साहेब हजर नाहीयेत.प्रशासनाने , उपायुक्तांनी या सगळयागोष्टी आयुक्तापर्यंत पाहोचवायच्या आहेत. की त्यावर आपल्याला पुढचा निर्णय ताबडतोब घेता येईल.

**श्री.नितीन लढढा** :- मा.सभापती महोदया, आपण आता तरी प्रशासनाला तशा सुचना द्या , की साधारणत: पुढच्या दहा दिवसामध्ये महासभा निघणार आहे. आणि त्या सभेमध्ये प्रशासनाच्या संपुर्ण डॉकेट सह की या कॉन्ट्रक्टरचं फेल्युअर काय आहे की जेणेकरून कायदेशीर तिढा उत्पन्न न होता , उद्या सुध्दा नुकसान भरपाईचा दावा हा

**मा.सभापती :-** हि जी मुदत आपण दिलेली होती ती आयुक्त साहेबांच्या विनंती वर दिली होती .कायदेशीर तिढा निर्माण होवु नये म्हणुन नाहीतर मागच्या महासभेमध्ये आपण ईथपर्यंत आलो होतो .की याचा ठेका बंद करावा आणि आपण आपली

व्यवस्था करावी . ती व्यवस्था काय असते ते बघतील ते नंतर ठरवणार. पण हे बंद करावं ईथ पर्यंत आलो होतो पण कायदेशीर तिढा होवु नये म्हणुन आपण ती एक महिन्याची मुदत दिलेली आहे. तर आपण आता हे प्रशासनाला कळवु . आणि मला असं वाटतं की मला सुचना देण्याची ही गरज नाही . कारण जर मागच्या महासभेतच हा निर्णय झालेला आहे की एक महिन्याची शेवटची मुदत आपण त्याला दिलेली आहे. तर आता हा प्रस्ताव प्रशासनाकडुन महासभेसमोर आला पाहीजे.

**श्री.नितीन लढढा** :- उपायुक्त साहेब पुढच्या आठ दहा दिवसांत महासभा होणार आहे.

**मा.सभापती :-** हि जबाबदारी आपली राहील . की हे आपण आयुक्तांपर्यंत पाहोचवायचं आहे आणि ही वस्तुस्थिती लक्षात घेवुन प्रशासनाचा प्रस्ताव आला पाहीजे.

**श्री.नितीन लढढा** :- सभापती महोदय , आमचा हा एक विषय आहे की गाळे करारा संदर्भातील आत आपण बघताय की साधारणत: मागील सात वर्षांपासुन हा विषय चाललेला आहे. या संदर्भात गाळेधारकांकडुन सुध्दा उत्स्फुर्त पणे रकमा भरण्याच्या संदर्भातील पावलं उचलली जाताय . प्रशासनही आपल्या पध्दतीने कार्यवाही करत आहे. आता गेल्या दोन तीन महिन्यामध्ये आचार संहिता होती. मी नव्हतो. परंतु सातत्याने गाळेधारकांकडुन विचारणा होंत होत्या की गाळयांच्या थकीत रकमा भरण्याच्या संदर्भात गाळेधारकांनी थोडसं थकबाकी भरण्याच्या संदर्भातील पाऊलं उचललेली आहेत. परंतु आज अशी परिस्थिती आहे की या गाळेधारकांच पुढचं भविष्य काय ? या गाळेधारकांना करारनामा नुतनीकरण करून देण्याच्या संदर्भातील प्रशासनाची भुमिका काय आहे. राज्य शासनाने याच्या संदर्भातील जो शासन निर्णय घेतलेला आहे. मला वाटतं की साधारणत: २३ मे २०१९ ला याच्या संदर्भातील शासन निर्णय झाला आहे. परंतु तो शासन निर्णय प्रशासनाने अजुनही महासभेसमोर किंवा स्थायी समोर आपण्याच्या संदर्भात कदाचित विसर पडण्याची तसदी घेण्याची प्रशासनाकडुन दिसुन येतेय .या संदर्भात जो गाळेधारकांच्या मनात संभ्रम आहे. की आज आम्ही आमची जी थकबाकीची रक्कम भरल्या नंतर आमच्या गाळयांच नुतनीकरण कश्या पध्दतीने केलं जाईल.याच्यावरची भाडे आकारणी कश्या पध्दतीने राहील. याच्यावर नव्याने प्रिमियम भरण्याची आवश्यकता पडेल काय. असे अनेक प्रश्न आहेत. तर या संदर्भात प्रशासनाने त्या संदर्भातील भुमिका या सभागृहासमोर मांडावी. जेणेकरून वृत्तपत्रांच्या माध्यमातुन किंवा आपल्या कडे ज्या ज्या वेळेला गाळेधारक येत असतील तेव्हा त्यांच्या मनातील शंका दुर करण्याच्या दृष्टीकोनातुन तुम्हाला आम्हाला सुध्दा ते सोईस्कर राहील.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आपण जो मुद्दा मांडला याची माहिती प्रशासन आपल्याला देवु शकले असते

**श्री.नितीन लढढा** :- साहेब सध्या संपुर्ण गाळेधारकांच्या मनामध्ये हिरो आहेत.

**मा.उपायुक्त (महसुल)** :- आमची आता असे की भाऊ आपण आता जो विषय मांडलेला आहे की , गाळयांचे नुतनीकरण किंवा त्यांचे पुढे फ्युचर काय असेल . त्यामध्ये आपल्याला शासनाने पहिले दोन फ्लेम नव्हते .त्याच्यानंतर १३ सप्टेंबर २०१९ ला शासनाने एक राजपत्र प्रसिध्द केलं त्याच्यामध्ये त्यांनी ड्यु प्रोसिजर जी होती ती दिली. त्याच्यामध्ये नुतनीकरण व जे भाडे निश्चित करायचे आहे . एक % रेडीरेकनर किंवा मार्केट रेट नुसार तर त्याच्या नुसार त्याला मान्यतेला पत्रव्यवहार केलेला आहे. आणि त्याच्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांच्या सोबत सोमवारी दुपारी ३ वाजता मिटींग आयोजित केलेली आहे. त्याच्यामध्ये ते आपल्याला भाडे निश्चित करून देणार आहेत. तीजी त्रिसदस्यीय समिती आहे. परंतु त्याच्यामध्ये टर्मस ॲन्ड कंडीशन्स दिलेल्या आहेत. की नुतनीकरण किंवा हस्तांतरण कुणाला करून द्यावं. याच्यामध्ये जी प्रोसिजर दिलेली आहे की या काही गाळयांचा पुर्वी लिलाव झाला होता का ? अधिनियमाच्या तरतुदीशी सुसंगतीत वैध हस्तांतरण झालं होत का ? किंवा टर्मस ॲन्ड कंडीशन्स त्याने फॉलो किंवा ॲग्रमेंट त्याने फीच केलं होतं का ? म्हणजे या स्वरूपाची किंवा भाडे त्याने थकीत ठेवलं होत का ? या स्वरूपाचं सगळं सविस्तर आहे. त्याच सगळे जे जुने प्रशासनाकडे अभिलेख आहे. जसे फुले मार्केट आहे , सेंट्रल फुले किंवा जुने बी.जे मार्केट याचे जे डॉक्युमेंट आहेत त्याची आम्ही तपासणी सुरु केलेली आहे .आणि काही गाळे धारकांचे जे प्रतिनिधी आहेत. त्यांना सुध्दा आम्ही विश्वासात घेतलेलं आहे. आणि त्यांच्याकडे जी काही डॉक्युमेंट उपलब्ध असतील तर ते मागवुन व या सगळयांचा विचार केल्यानंतर आणि याच्याबाबत , मॅडम सुध्दा त्यादिवशी चर्चेमध्ये होत्या . मा.आमदार साहेब , व आयुक्त साहेबही होते . यांच्याशी आम्ही चर्चा केली आमची प्रायमरी चर्चा झालेली आहे. आणि त्या दृष्टीने आम्ही व्यापाऱ्यांचे अहित होवु नये. किंवा कोणतेही लिगली ॲक्शन आपल्याला उपलब्ध होवु नये याबाबतीत असे पाऊलं आपल्याला उचलायचे आहेत.

**श्री.नितीन लढढा** :- आपण ५ पट दंडाच्या संदर्भाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला होता. आज ५ पट दंडाची जी आकारणी केलेली होती. त्याच्यासंदर्भात समितीने निर्णय घेतला होता आणि तो आपण राज्य शासनाकडे पाठवला होता. ५ पट दंडाची आकारणी गाळे धारकांवर केलेली होती आणि त्या दंडाची माफी व्हावी अश्या पध्दतीचा समितीने एक अहवाल दिला होता. तो अहवाल राज्य शासनाकडे याच्या पुर्वी ज्या ठरावाच्या अनुषंगाने ती समिती गठीत झालेली होती. तो ठराव राज्य शासनाकडे विखंडनाला पाठविलेला होता. तो ठराव विखंडन होऊन आला तर त्याच स्टेटस काय ? किंवा ५ पट जी दंडाची आकारणी केलेली आहे ती वैध आहे की अवैध आहे. कारण की पैसे त्यांच्याकडुन दंडासकट आपण भरुन घेत आहे.

**मा.उपायुक्त (महसुल)** :- नाही तो कायम आहे , जो ठराव ४ पटचा आहे . आणि नंतर १ पटचा जो करण्यात आलेला होता तो विखंडनाला पाठविलेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** पाठविला तर तो विखंडन होऊन आला का ?

**मा.उपायुक्त (महसुल)** :- अद्यापपावेतो नाही. त्याची माहिती नाही माझ्याकडे.

**श्री.नितीन लढढा :-** विखंडन होऊन आलेला नाही म्हणुन त्यात समान अवस्था आहे. एकीकडे ५ पट दंड लावत आहे आणि एकीकडे या बॉडीने ठराव करुन तो माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मग तश्या परिस्थिती मध्ये आपण संपुर्ण रक्कम भरुन घेत आहे.

**मा.उपायुक्त (महसुल)** :- आता मिटींग मध्ये मी ठरावाबद्दल सांगत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे तीच पोझीशन दिसत आहे ना. म्हणजे कुठेतरी सभागृहाचा अवमान होत आहे. जो पर्यंत सभागृहाने दिलेला ठराव राज्य शासन विखंडीत करत नाही. तो सुध्दा प्रोसेस मध्ये आहे. अस धरले जाते. एक तर तो ठराव विखंडन होऊन यायला पाहिजे. किंवा जो आपण ५ पट वसुल करत आहे ते कमीत कमी अंडर प्रोटेस्ट करायला पाहिजे. आता बी.जे. मार्केट मधील काही गाळेधारक, या संदर्भात रिफंडेबल डिपॉजीट राहु द्या. रिफंडेबल डिपॉजीटची ती अमाऊंट होती कमी. काही तरी रु.६५०००/- होती. परंतु त्या ६५ हजाराची रिफंडेबल डिपॉजीट ही आता आपण भाडे भरुन घेतांना समायोजन करुन घेतली नाही. आपण त्यांना प्रशासनाकडुन असे पध्दतीने उत्तर दिल की, आता तुम्ही बेकायदेशीर भोगवटा करत आहे म्हणुन तुमची ती अमाऊंट जी आहे. ती आम्ही तुम्हाला रीफंड करू शकत नाही. हि काही मुदत संपल्यानंतर ६५ हजार आहे बी.जे. मार्केट च्या संदर्भातील ती रीफंडेबल अमाऊंट होती . परंतु त्यांना प्रशासन रीफंड करत नाहीये .

**मा.सभापती :-** पुढच्या मिटींग पर्यंत माहिती द्यावी .

**मा.उपायुक्त (महसुल)** :- पुढच्या मिटींग पर्यंत माहिती देतो.

**श्री.नितीन लढढा :-** नाही याच्या संदर्भात एक सविस्तर परिस्थिती निर्माण व्हायला पाहीजे. याच्या संदर्भात उच्च न्यायालयाने, सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्वाळे त्याचा पुढे कंन्टेंम्पट होणार नाही त्यासंदर्भातही काळजी घ्यावी लागेल.आणि हा जो शासन निर्णय झालेला आहे याच्यामध्येही अजुन खुप त्रुटी आहेत. म्हणजे याचा फायदा आज गाळे धारकांना देता येईल. ही सुध्दा एक संभ्रम अवस्था आहे.आणि गाळयांचा लिलाव झाला आहे की नाही. म्हणजे बरेचशे मार्केट माझ्या माहिती प्रमाणे एखादे मार्केट सोडल्यानंतर बाकीच्या मार्केटचा रितसर लिलावच झालेला नाहीये. मग अशा परिस्थिती मध्ये गाळेधारकांना न्याय आपण कसा देणारं . गाळेधारकांना न्याय द्यायचा . महानगरपालिकेचा उत्पन्नाचा स्त्रोत हा जिवंत ठेवायचा आहे . अशा पध्दतीने प्रस्ताव हा तातडीने करावा लागेल.आता मला वाटतं साधारणत: पुन्हा ५२ का ५४ गाळे सिलही केलेले आहेत. विविध संस्था आणि व्यापाऱ्यांचे , तर आता ह्या जप्त केलेल्या गाळयांच्या संदर्भात प्रशासनाची भुमिका काय आहे ? या गाळयांचा लिलाव करणार किंवा कशा पध्दतीने करणार की मग. अशा पध्दतीने महानगरपालिकेच्या याच मार्केटचे २००० स्के.फुटचे १६०० स्के.फुटचे गाळे अश्याच प्रशासनाच्या दिरंगाईमुळे वर्षानुवर्षे खाली पडलेले होते. कदाचित आज ही त्यात काही गाळे खाली असतील. अश्या पध्दतीने एकदा जर महानगरपालिकेच्या मिळकती दुर्लक्ष व्हायला लागल्या, त्या कायम स्वरुपी दुर्लक्षीत होतात. किंवा कुठेतरी चुकीच्या कामासाठी त्याचा उपयोग होतो. तर या संदर्भातला ही निर्णय तातडीने होणे गरजेचे आहे. आज जे गोलाणीच व्यापारी संकुल आहे याचे हस्तांतरण नुतनीकरण बंद केलेले आहे. हस्तांतरणाची प्रक्रिया बंद केलेली आहे. आणि ही जवळपास चार वर्षापासुन बंद केलेली आहे. मी वारंवार या सभेत प्रशासनाला सुचना केल्या. याच्या मधुन साधारणता प्रशासनाला ४ ते ५ कोटीच उत्पन्न आपल्याला मिळु शकेल. आज विना परवानगी हस्तांतरण सुरु आहे. विना परवानगी म्हणजे म्युचअल अंडरस्टॅण्डींग मध्ये हस्तांतरण सुरु आहे. एका गाळयाच हस्तांतरण साधारणता ३-३ व ४-४ वेळा झालेल आहे. ३ वेळा हस्तांतरण झाल्यामुळे तीन वेळा महानगरपालिकेला मिळणारा रिव्हेन्यु आज लॅप्स झालेला आहे. हे एक गाळे धारक आहे यांनी मला हस्तांतरण केल. मी यांना हस्तांतरण केल. त्यांनी याला हस्तांतरण केलेले आहे. पण गाळा यांच्याच नाव वर दिसत आहे.

**मा.उपायुक्त (महसुल)** :- आता प्रॉबलम कसा झाला, प्रशासनाने रेडीरेकनरच्या दुप्पटचा प्रस्ताव दिला होता.

**श्री.नितीन लढढा :-** तसा नाही झाला होत. रेडीरेकनरच्या २५% प्रमाणे लागु करण्याच्या संदर्भात तत्कालीन प्रशासनाने प्रस्ताव दिला होता. त्यावेळेला आयुक्त श्री.किशोरराजे निंबाळकर साहेब होते. त्यांनी काय केल. संपुर्ण पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला समान दर धरलेले होते. अश्या पध्दतीने तो तिढा निर्माण झाला होता. प्रशासनाने सांगितल, पुर्वी सुधारीत प्रस्ताव हस्तांतरणाच्या संदर्भात द्या. त्या गोष्टीला आज दिड वर्ष होऊन गेले. याच्या मधुन मनपा ला ४ ते ५ कोटी उत्पन्न मिळेल. दोन गोष्टी आहे गाळेधारक सुध्दा स्वत:ला असुरक्षीत समजतो, यांच्या कडुन मी घेतलेला आहे परंतु माझ्या नावावर झालेला नाही. अजुन गाळा यांच्याच नावावर आहे. जर उद्या काही वेगळी परिस्थिती निर्माण झाली तर हे उद्या त्या गाळयावर क्लेम करतील कारण त्या ठिकाणी यांचच नाव लागलेल आहे. त्यामुळे गाळेधारक ही राजीखुशी ती फी भरणेस तयार आहे. म्हणजे त्यालाही दिलासा मिळतो आणि महानगरपालिकेला ही दिलासा मिळतो.

**मा.उपायुक्त (महसुल)** :- तो ठराव काय आहे की, निलंबीत होऊन आला, विखंडीत होऊन आला असता तर काही पॉलिसी डिसाईड झाली असती. शासन स्तरावर तो फक्त निलंबीत झालेला आहे.

**श्री.नितीन लढढा :-** परंतु त्याचा पाठपुरावा करण्यात यावा. कारण शासन काय करतो ते तुम्हाला ही कल्पना आहे आणि आपल्याला ही कल्पना आहे कारण जो पर्यंत आपण पाठपुरावा करत नाही. तो पर्यंत काही निष्पण्ण होणार नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्याला पर्याय काय ?

**श्री.नितीन लढढा :-** त्या गाळेधारकांच्या बाबत लवकर आपण अभ्यास करुन. कश्या पध्दतीने दिलासा मिळेल आणि कसा हा प्रश्न सोडविला जाईल. त्यांना भविष्यात कॉम्प्लीकेशन नाही यायला पाहिजे. पुढे महानगरपालिकेच आर्थिक नुकसान होऊन पुढे जर निर्णय घेणाऱ्यांच्या विरोधात सुध्दा या संदर्भातली, काही ऑब्जेक्शन होता कामा नये. अशी व्यवस्था आपण करुन योग्य तो प्रस्ताव तातडीने द्यावा. नविन शासन निर्णय जे आहे त्याच्यामध्ये ट्रायपार्टी ॲग्रीमेंट नाही. त्याच्या मध्ये महानगरपालिकेची गाळे धारकांची ताब्यात असलेली मिळकत ही कुठे तारण ठेवता येणार नाही. मध्यंतरीच्या काळामध्ये फुले मार्केटचे सर्वच व्यापारी हे विविध बँकाच्या संपर्कात होते . काही जळगांव जनता तर काही पिपल्स बँकेच्या संपर्कात होते . की ट्रायपार्टी ॲग्रीमेंट तारण करून त्याच्या मधुन लोन प्रकरण पास व्हावं. परंतु शासन निर्णय वाचल्यानंतर त्याच्यामध्ये या सगळया गोष्टींना बंधनं टाकलेली आहेत.म्हणजे गाळेधारकाला संपुर्ण रक्कम स्वत:च उभारणी करायची आहे. अशा अनेक अडचणी त्याच्यामध्ये आहेत. तरी त्याचा संपुर्ण सखोल अभ्यास करून त्याचा प्रस्ताव तातडीने महासभेसमोर ठेवावा.

**श्री.चेतन सनकत :-** धन्यवाद ताई , आता माझे नांव घेतल्यामुळे संभ्रम वाटलं. साहेब आपण माझं नांव घेवुन बोलले ,की दोन तिन वेळा चौकशी साठी गेलो . काही आढळल नाही . पण मला आठवते की आपण जेव्हा सोबत गेलो तेव्हा काही आढळले नाही. जेव्हा उपमहापौर सो मी आणि आमचे सन्मा.कुंदनभाऊ आम्ही गेले जात असतांना त्यावेळेस आरोग्याधिकारी साहेब त्यांना सांगुन गेलो की तुम्ही सोबत चला . ते नाही म्हणाले मला काही अडचणी आहे तुम्ही जाऊन या असे म्हणाले. हा त्यावेळेचा फोटो पेपरला पण आलेला आहे. आम्ही त्यावेळेला आढळलं त्याअनुषंगाने उपमहापौर यांनी तक्रार केली . आपण ज्या पध्दतीने सांगीतले की आम्ही गेलो तेव्हा काही आढळलं नाही आणि दुसऱ्या वेळेला आढळले आहे. थोडसं तुम्ही बघा कारण माझ्या प्रती संभ्रम निर्माण होवु नये तेवढ सांगाव लागतयं. आणि दुसरी गोष्ट सर आपण काल कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मक्तेदाराला समजवलेले आहे. तरीही आज आत्ताही २५ ते ३० कर्मचारी खाली बसलेले आहेत. त्या संदर्भात काय करायचे ते बघा . मक्तेदाराला बोलवा तिकडे , कर्मचाऱ्यासोबत बसुन बोला .आणि मार्ग काढा काय काढायचा आहे तो.

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**